रक्त नमुने तपासणीसाठी मायक्रोस्लाईड (काचपट्टी) खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः खरेदी-२०१७/प्र.क्र. २७२/आरोग्य-८
नविन मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय कंपांउंड,
कॉम्पलेक्स बिल्डींग, १० वा मजला, मुंबई ४००००१
दिनांक: १९ जानेवारी, २०१७

संदर्भ-

१) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक संआसे/साथरोग कक्ष-६/मायक्रोस्लाईड (काचपट्टी)/प्रशासकीय मान्यता/न.क्र.४९०-९२/२०१७, दिनांक २४.०८.२०१७
२) सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे यांचे पत्र क्रमांक ससंआसे/किजरो/ मायक्रोस्लाईड (काचपट्टी)/प्र.मंजुरी/ भांडार-१/न.क्र.८५(अ)/१७६३३-३५, दिनांक १९.०७.२०१७

प्रस्तावना -

राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत राज्यात दरवर्षी सरासरी १.५० कोटी इतक्या रक्त नमुन्यांची तपासणी करण्यात येते. रक्त नमुन्यांची तपासणी करण्यासाठी स्वतंत्र काचपट्टीचा वापर करण्यात येतो. त्याअनुषंगाने १,१२,१८,६५० इतक्या काचपट्या (२,२४,३७३ पॅकेट) खरेदी करण्यासाठी निविदा प्रक्रिया करण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत संदर्भीय पत्रांन्वये प्रस्ताव प्राप्त झाला आहे. त्यानूसार सदर खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

आरोग्य सेवा संचालनालयाने संदर्भीय पत्रांन्वये सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, एकूण २,२४,३७३ पॅकेट (प्रति पॅकेट ५० नग) मायक्रोस्लाईड (काचपट्टी) खरेदी करण्यासाठी (एकूण अंदाजित किंमत रु.५८,२२,४७९/-) निविदा प्रक्रिया करण्यास खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

१) सदरहू बाबीची आवश्यकता/मागणी याची शहानिशा/खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच सदर बाबींच्या खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.
२) सदर बाबीचे विनिर्देश गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खातरजमा करण्यात यावी. खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical specification) संबंधित तज्ञांनी (तांत्रिक समिती/अधिकारी यांनी) मान्य केलेल्या विनिर्देशानूसार असावेत. तसेच सदर तांत्रिक विनिर्देश

(Technical specification) हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होईल अशा रितीने तयार केलेले नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच या बाबींची खरेदी करण्यात यावी.

३) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस २०१४/प्र.क्र.८२/भाग-III /उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारीत नियमपुस्तिका यामधील तरतुदीनुसार विहित खरेदी प्रक्रिया राबविण्यात यावी.

४) प्रशासकीय मान्यता देताना प्रस्तावित खरेदीचे दर हे अंदाजित आहेत. त्यामुळे खरेदी प्रक्रियेअंती निश्चित करण्यात आलेला दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधित पुरवठादाराने या बाबीचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खाजरजमा करण्यात यावी.

५) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठापूर्व/ पुरवठानंतर नमुना तपासणी (Pre/Post dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

६) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींचा पुरवठा झाल्यानंतर त्यांची साठवणूक व वितरण (storage & distribution) करणे तसेच पुरवठा साखळी व्यवस्थापन (Supply chain management) आणि वस्तुसूची व्यवस्थापन (Inventory Management) योग्य पध्दतीने करुन सदर बाबी विनावापर पडून राहणार नाहीत व त्यांचा विहीत मुदतीत वापर होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

७) सदरहु खरेदीसाठी होणारा खर्च खालील नमूद लेखाशिर्षांअंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा :-

अ) बिगर आदिवासी जिल्ह्यांसाठी खरेदी करावयाच्या ६२,६७८ पॅकेट मलेरिया स्टेनिंग किटवरील खर्च (अंदाजित रक्कम रु. १६,२६,४९४/-) "२२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य- केंद्र पुरस्कृत योजना- (राज्य हिस्सा)- (०१) (४८) राष्ट्रीय हत्तीरोग नियंत्रण कार्यक्रम- २१ पुरवठा व सामग्री (२२१० ५१६६)" या लेखाशिर्षाअंतर्गत मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

आ) आदिवासी जिल्ह्यांसाठी खरेदी करावयाच्या १,६१,६९५ पॅकेट मलेरिया स्टेनिंग किटवरील खर्च (अंदाजित रक्कम रु. ४१,९५,९८५/-) जिल्हा वार्षिक योजनांतर्गत "२२२५ई" या लेखाशिर्षांअंतर्गत मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

८) या बाबीवर होणारा खर्च जिल्हा वार्षिक योजनाअंतर्गत उपलब्ध असलेल्या निधीमधून भागविण्यात येणार असल्यामुळे सदर बाबीची प्रत्यक्षात खरेदी करण्यापुर्वी यासंदर्भात सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता तसेच प्रशासकीय मान्यता प्राप्त करण्यात यावी.

९) तसेच सदर खरेदीची द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

१०) संपुर्ण खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

११) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन मधील अ.क्र.४, नियम क्रमांक ७ समोरील स्तंभ क्रमांक ६ येथील अटींची पुर्तता करण्यात यावी.

१२) दिनांक २६.०७.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनूसार कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त अनुक्रमांक १ ते १२ येथे नमूद अटींची पुर्तता करण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत कार्यक्रम प्रमुख यांची तसेच आरोग्य सेवा संचालनालयाची राहील.

२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग दोन मधील अ.क्र.४, नियम क्र. ७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानूसार सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११९१३०८५४१६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2018.01.19 17:26:53 +05'30'

(व.मुं.भरोसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
३) सहसंचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
४) सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) , आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

५) सहसंचालक,आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे
६) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई
७) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरिक्षा/लेखा अनुज्ञेयता), नागपूर
८) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
९) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
११) निवडनस्ती (आरोग्य-८)